## बदलापूर चकमक प्रकरणी शनिवारपर्यंत गुन्हा दाखल करण्यासाठी मुदत

# एसआयटीला चपराक

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** न्यायालयाच्या अवमान कारवाईच्या इशाऱ्यानंतर बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याच्या कथित चकमकीचा तपास विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) वर्ग करण्यात आला. तथापि, शिंदे याच्या चकमकीसाठी महानगरदंडाधिकाऱ्यांनी जबाबदार ठरवलेल्या पाच पोलिसांवर गुन्हा दाखल केलाच नाही. त्यामुळे, संतापलेल्या उच्च न्यायालयाने बुधवारी सरकारची भूमिका दुर्दैवी असल्याची टीका करून पुन्हा एकदा अवमान कारवाईचा इशारा दिला.

त्यामुळे, आधी गुन्हा दाखल करण्यातील अडचणींचा पाढा वाचणाऱ्या सरकारला अखेर शनिवारपर्यंत या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची हमी न्यायालयात द्यावी लागली.

शिंदे याचे वडील म्हणजेच तक्रारदाराचा ठावठिकाणा माहीत नसल्याने या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला नाही, असे सरकारतर्फे सुरूवातीला न्यायालयाला सांगण्यात आले. त्यानंतर, गुन्हा दाखल करण्यासाठी न्यायदंडाधिकाऱ्यांचा अहवाल उपलब्ध करण्याची मागणी सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी न्यायालयाकडे केली. थेट तक्रारीविना गुन्हा दाखल करू शकत नसल्याच्या अन्य सबबीही सरकारकडून न्यायालयाला देण्यात आल्या. तथापि, न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने उपरोक्त दाव्यांबाबत आश्चर्य व्यक्त केले. तसेच, गुन्हा दाखल करण्यासाठी केल्या जाणाऱ्या विलंबाबाबत आणि त्यासाठी दिल्या जाणाऱ्या कारणांबाबत न्यायालयाने संताप व्यक्त केला. आदेशाला महिना होत आला तरी प्रकरण एसआयटीकडे वर्ग केले नव्हते. आता प्रकरण एसआयटीकडे वर्ग केले आहे, तर गुन्हा नोंदवण्यात विलंब केला जात आहे, असेही न्यायालयाने सरकारला सुनावले.

सरकारकडून वारंवार न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केले जात आहे. सरकारची ही भूमिका अत्यंत दुर्दैवी आणि खेदजनक आहे, अशी टीकाही न्यायालयाने केली. तसेच, पुढील दोन तासांत गुन्हा नोंदवला जावा अन्यथा अवमान कारवाईला सामोरे जाण्यास तयार राहा, असे न्यायालयाने सरकारला बजावले. त्यानंतर, पोलीस अधिकारी मंगेश देसाई हे या प्रकरणी तक्रार दाखल करतील, त्यानंतर, संबंधित पाच पोलिसांवर शनिवारपर्यंत गुन्हा दाखल केला जाईल, अशी हमी न्यायालयाने सरकारला दिली.



व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास ढळू देऊ नका, दखलपात्र गुन्हा घडतो तेव्हा पोलिसांनी लागलीच गुन्हा नोंदवायला हवा होता. पोलिसांचे ते कर्तव्य आहे. तसेच, कायद्याची अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्याची जबाबदारी न्यायालयावर आहे. कृपा करून अशा विलंबाद्वारे किंवा टाळाटाळ करण्याच्या भूमिकेमुळे पोलीस व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कमी होऊ देऊ नका.

–उच्च न्यायालय, मुंबई

### इशाऱ्यानंतर सरकारची माघार

शिंदे याचा अनैसर्गिक मृत्यू झाला आहे. गुन्हा दाखल करण्यासाठी तुम्हाला आणखी काय पुरावा हवा आहे ? असा उद्विग्न प्रश्नही न्यायालयाने केला. न्यायालयाच्या या टीकेनंतरही सरकारकडून गुन्हा दाखल करण्यातील अडचणींचा पाढा वाचण्यात आला. त्यामुळे, संतापलेल्या न्यायालयाने या प्रकरणी गुन्हा दाखल केला नाही, तर अवमान कारवाई सुरू करू, असा इशारा सरकारला दिला. अखेर सरकारने माघार घेतली.

# भारतीय रेल्वेची 'भारत गौरव सर्किट यात्रा'

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांना आदरांजली वाहण्यासाठी, त्यांच्या जीवनाशी संबंधित महाराष्ट्रातील सर्वात प्रतिष्ठित स्थळांना भेट देता यावी यासाठी भारतीय रेल्वेने 'भारत गौरव सर्किट यात्रे'चे आयोजन केले असून या यात्रेच्या निमित्ताने इतिहासप्रेमी, पर्यटकांना गड-किल्ल्यावर घेऊन जाण्यात येणार आहे. इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशनने (आयआरसीटीसी) या योजनेअंतर्गत सहा दिवसीय सहलीचे आयोजन केले आहे. याद्वारे पर्यटकांना, इतिहासप्रेमींना ऐतिहासिक किल्ले, मंदिरे, स्मारके यांना भेटी देण्याची संधी मिळणार आहे.

भारत सरकारच्या 'देखो अपना देश' आणि 'एक भारत श्रेष्ठ भारत' या उपक्रमाच्या अनुषंगाने, देशांतर्गत पर्यटनाला चालना देण्यासाठी भारत गौरव टूरिस्ट ट्रेन चालवण्याकरीता पुढाकार घेतला आहे. यासाठी विशेष पर्यटन ट्रेन पॅकेज सुरू करण्यात आले आहे.


pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

**पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड परिशिष्ट-४-अ स्थावर मालमत्तेची ई-लिलाव विक्री सूचना (आयईएस)**

सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीनुसार सहवाचता सिक्युरिटायजेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव-विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय :- ९ वा मजला, अंतरीक्ष भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१, फोन :- ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेब :- www.pnbhousing.com

**नाशिक शाखा :** पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, ४०७ आणि ४०८, ४था मजला, पद्म विश्व लँडमार्क, तनिष्क शोरूमजवळ, अॅक्सिस बँकेच्यावर, राक्का कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२००२. **औरंगाबाद शाखा :** ई-१, ई-२ आणि ई-३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेंटर, अदालत रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१.

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदार आणि जामीनदार यांना रकाना क्र. - ए मध्ये सूचित केलेले नोटीस देण्यात आली आहे की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन कॉलम क्र -डी मध्ये गहाण/सुरक्षित धनकोकडे केली आहे, मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने (रकाना क्र. - सी मध्ये वर्णन केल्याप्रमाणे) ज्याचा रचनात्मक/भौतिकदृष्ट्या ताबा सुरक्षित धनको यांनी घेतला आहे, त्याची खाली नमूद केलेल्या तपशिलांनुसार **'जसे आहे तिथे आहे, जे आहे तसे आहे'** आणि **'तेथे जे काही आहे या तत्त्वावर'** विक्री केली जाईल. तारखेनुसार सुधारित असलेल्या सिक्युरिटी इंटरेस्ट अंमलबजावणी नियम, २००२ च्या नियम-८(६) आणि ९ अंतर्गत रकाना क्र. ए यात दर्शवलेल्या प्रकरणाप्रमाणे याद्वारे कर्जदार/गहाण ठेवणारे/कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी, (ज्ञात किंवा अनोळखी), निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, संबंधित कर्जदार/गहाणदार (मृत झाल्यापासून) यांना नोटीस देण्यात आली आहे. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/सुरक्षित धनकोची वेबसाइट म्हणजेच **www.pnbhousing.com** यावर प्रदान केलेल्या दुव्याचा संदर्भ घ्या.

| कर्ज क्र., कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार/कायदेशीर वारस यांचे नाव (ए) | मागणी केलेली रक्कम आणि तारीख (बी) | ताब्यात घेण्याचे स्वरूप (सी) | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी) | आरक्षित किंमत (आरपी) (ई) | ईएमडी (आरपीच्या १०%) (एफ) | बोली सादर करण्याची अंतिम तारीख (जी) | बोली वृद्धी दर (एच) | तपासणीची तारीख आणि वेळ (आय) | लिलावाची तारीख आणि वेळ (जे) | ज्ञात भार/न्यायालयीन प्रकरणे असल्यास (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एचओयू/एनएसके/०४२२/९७९०५६, बीओ: नाशिक, विनय सेसू पुजारी/अमृता विनय पुजारी | रु. १४१८४९६.९४ आणि दि. ०७.०२.२०२४ रोजीनुसार | भौतिकदृष्ट्या ताबा | फ्लॅट क्र. सी-१२, ३रा मजला, सर्व्हे क्र. १९९ए/१/१बी, सीटीएस क्र. ५८७०ए/२, श्री पेठकर प्लाझा हाऊसिंग सोसायटी लि., नाशिक, पेठ रोड, स्टेट बँकेजवळ, मखमलाबाद, पंचवटी, नाशिक, महाराष्ट्र, ४२२००३ | रु. १५८०००० | रु. १५८००० | ३०.०५.२०२५ | रु. १०,००० | दि. २१.०५.२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. ते ०४.०० वा. दरम्यान | दि. ३१.०५.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वा. ते ०३.०० वा. दरम्यान | माहीत नाही |
| एचओयू/एआरएनजी/०४२२/९८६३३०,एनएचएल/एआरएनजी/०६२२/९९७४४२, बीओ: औरंगाबाद, आशामती गजानन ढवळे/ गजानन विश्वनाथ ढवळे | रु. १४६६२९०.२४ आणि दि. ०७.०३.२०२४ रोजीनुसार | भौतिकदृष्ट्या ताबा | फ्लॅट क्र. ३०२, इमारत क्र. एच, स्टिल्ट दुसरा मजला, ओमिक्रॉन अॅस्पायर, गट क्र. १४, फत्तेपूर ता. आणि जिल्हा औरंगाबाद महाराष्ट्र, ४३१००१ | रु. १३२०००० | रु. १३२००० | १९.०५.२०२५ | रु. १०,००० | दि. ०९.०५.२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. ते ०४.०० वा. दरम्यान | दि. २०.०५.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वा. ते ०३.०० वा. दरम्यान | माहीत नाही |

*आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इ. देय झाल्याच्या तारखेपर्यंत आणि/किंवा त्याची प्राप्ती होईपर्यंत संबंधित पुढील व्याज @१८% दरसाल लागू आहे. ** पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीसाठी आणि माहितीनुसार, वर नमूद केलेल्या स्थावर/सुरक्षित मालमत्तेच्या संदर्भात इतर कोणतेही दायित्व/दावे नाहीत, जे स्तंभ क्र.-के मध्ये उघड केले आहे. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराकडून त्याच्या/तिच्या शेवटी पूर्ण केले जातील/अदा केले जातील. संभाव्य खरेदीदार/बोलीदारांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी नमूद केलेल्या भारांची सत्यता स्वतंत्रपणे पडताळून पाहावी.

**१.** आजपर्यंत, वरील स्थावर मालमत्तेची विक्री, विल्हेवाट लावणे आणि/किंवा विल्हेवाट लावण्यापासून पीएनबीएचएफएल/पीएनबीएचएफएल यांच्या अधिकृत अधिकाऱ्याला प्रतिबंधित करणारा कोणताही आदेश आणि/किंवा न्यायालयीन मनाई नाही. **२.** संभाव्य खरेदीदार/बोलीदार आणि इच्छुक पक्ष स्तंभ क्र.-के यामध्ये नमूद केलेल्या कार्यवाही/आदेश इत्यादींमध्ये, जर काही असेल तर, स्वतंत्रपणे विनंतीची तपासणी करू शकतात. पीएनबीएचएफएल यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मालकीच्या कागदपत्रांच्या शीर्षकाचा समावेश आहे, परंतु त्यापुरते मर्यादित नाही आणि निविदा/बोली अर्ज सादर करण्यापूर्वी किंवा प्रस्ताव देण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वत:चे समाधान करू शकतात. बोलीदारांना बोली अर्जासह या लिलावाच्या अटी आणि शर्तीवर स्वाक्षरी करावी लागेल. **३.** कृपया लक्षात घ्या की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ९(३) नुसार, बोलीदार/खरेदीदार कायदेशीररित्या विक्री किमतीच्या २५% रक्कम (इसारा ठेव अनामत रकमेसह) त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसाच्या आत जमा करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ९(२) नुसार, सुरक्षित धनकोने विक्री किमतीच्या २५% रक्कम प्राप्त केल्यानंतरच (बोलीदाराच्या नावे) विक्रीची पुष्टी केली जाऊ शकते. विक्री पुष्टीकरण पत्र मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेपैकी उर्वरित ७५% रक्कम खरेदीदाराने जमा करावी लागेल आणि अशी ठेव न भरल्यास, अधिकृत अधिकारी विक्री पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचा काही भाग जप्त करेल आणि सरफेसी कायद्याच्या तरतुदींनुसार मालमत्ता/सुरक्षित मालमत्ता पुन्हा विक्री करण्यात येईल. **४. मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** अधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाद्वारे विक्री करण्यास मदत करेल, ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. ६८, ३ मजला, सेक्टर ४४, गुडगाव, हरियाणा १२२००३ येथे आहे, वेबसाइट- www.bankeauctions.com मालमत्तेच्या तपासणीशी संबंधित कोणत्याही मदतीसाठी किंवा बोली कागदपत्रे मिळविण्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नांसाठी किंवा नोंदणीसाठी, तुम्हाला **गणेश अंकुश/ नीलाक्षी पाटील** यांच्याशी संपर्क साधावा लागेल, टोल-फ्री : **१८०० १२० ८८००**, हे पीएनबीएचएफएलची अधिकृत व्यक्ती आहेत किंवा www.pnbhousing.com पहा.

**ठिकाण : नाशिक, तारीख : ०१.०५.२०२५** — **अधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**


# श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे १८ जूनला प्रस्थान

## यंदा पालखी सोहळ्याचे ३४० वे वर्ष

लोकसत्ता प्रतिनिधी

**पिंपरी :** आषाढी वारीसाठी जगद्गुरू संत शिरोमणी तुकाराम महाराजांची पालखी देहू येथून १८ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. १९ दिवसांचा प्रवास करून हा पालखी सोहळा ६ जुलै रोजी पंढरीत दाखल होईल. ६ ते १० जुलै रोजी हा पालखी सोहळा पंढरपूर येथे मुक्कामी राहणार आहे. पालखी सोहळ्यात तिथीचा क्षय झाल्याने अंथुर्णे येथील मुक्काम रद्द करण्यात आला आहे. यंदा पालखी सोहळ्याचे ३४० वे वर्ष आहे.

देहू संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांनी याबाबतची माहिती दिली. पालखीचे प्रस्थान १८ जून रोजी होणार असून पहिला मुक्काम येथील इनामदार वाड्यात होईल. १९ जून रोजी संध्याकाळी पालखी आकुर्डी येथील श्री विठ्ठल मंदिरात दुसऱ्या मुक्कामासाठी थांबेल. २० आणि २१ जून रोजी पालखी पुण्यात नाना पेठेतील श्री निवडुंगा विठ्ठल मंदिरात मुक्कामी असेल, २२ जून रोजी पुण्यातून लोणी काळभोर कदमवाकवस्ती पालखीतळाकडे रवाना होईल. २३ जून रोजी यवत येथील भैरवनाथ मंदिर पालखी तळावर मुक्कामी असेल. २४ जून रोजी वरवंड येथील विठ्ठल मंदिरात, २५ जूनला उंडवडी गवळ्याची येथे, २६ जूनला बारामती शारदा विद्यालयाच्या प्रांगणात, २७ जूनला सणसर येथे पालखी मुक्कामी असेल. २८ जूनला पालखी सणसरमधून पहाटे निघून बेलवडी येथे पहिले गोल रिंगण होईल. २९ जूनला पालखीचे इंदापूर येथे दुसरे गोल रिंगण होईल. ३० जूनला पालखी सराटी येथे मुक्कामी असेल. १ जुलै रोजी सकाळी संत तुकाराम महाराजांच्या पादुकांना सराटी येथे निरा स्नान घालून हा सोहळा अकलूजकडे मार्गस्थ होईल. २ जुलैला अकलूजवरून सकाळी निघेल, दुपारी माळीनगर येथे पहिले उभे रिंगण होईल. त्यानंतर रात्री बोरगाव येथील पालखी तळावर मुक्कामी राहील.

पालखी ३ जुलैला तोंडले बोंडले येथे धावा करून पिराची कुरोली येथे मुक्कामासाठी रवाना होईल. ४ जुलैला सायंकाळी बाजीराव विहीर येथे दुसरे उभे रिंगण पार पडेल. ५ जुलै रोजी सकाळी वाखरी येथून पंढरपूरकडे पालखी रवाना होईल. सायंकाळी पादुका आरतीस्थळी सोहळ्यातील शेवटचे आणि तिसरे उभे रिंगण पार पडेल. त्यानंतर सायंकाळी श्री क्षेत्र पंढरपूर शहरात प्रवेश होईल.

## 'महारेरा'चे नवीन ॲप्लिकेशन पोर्टल ५ मेपासून कार्यान्वित

**मुंबई :** महारेराने काही महिन्यांपूर्वीच आपल्या संकेतस्थळात बदल, सुधारणा करून ते कार्यान्वित केले. आता या संकेतस्थळावरील नवीन ॲप्लिकेशन पोर्टल ५ मेपासून कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे नवीन ॲप्लिकेशन पोर्टस सुरू झाल्यास गृहनिर्माण प्रकल्पाची नोंदणी, प्रकल्पास मुदतवाढ आणि प्रकल्पात, प्रकल्पाच्या माहितीत काही दुरुस्ती करणे आता अधिक सोपे होणार आहे. त्याचवेळी ज्या विकासकांनी सध्याच्या संकेतस्थळावर नोंदणी केली आहे वा मुदतवाढ मागितली आहे वा काही दुरुस्तीसाठी अर्ज केला आहे, त्यांची पुढील प्रक्रिया मात्र जुन्या ॲप्लिकेशन पोर्टलद्वारेच पूर्ण होणार आहे. त्यांना नव्याने अर्ज करण्याची गरज नाही, असे महारेराने स्पष्ट केले आहे.

# राज्यातील पहिले रोबोटिक मूत्रपिंड प्रत्यारोपण नागपुरात!

## सुपरस्पेशालिटीतील डॉक्टर जाणार प्रशिक्षणासाठी

महेश बोकडे, लोकसत्ता

**नागपूर :** रोबोटिक मूत्रपिंड प्रत्यारोपण लवकरच नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाशी (मेडिकल) संलग्नित सुपरस्पेशालिटी रुग्णालयातील तज्ज्ञांच्या मदतीने करण्याची तयारी सुरू आहे. त्यासाठी येथील तज्ज्ञ डॉक्टरांना प्रशिक्षणासाठी इतरत्र पाठवले जाणार आहे. हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील राज्यातील पहिले रोबोटिक प्रत्यारोपण असेल.

युरोपियन देशांत अवयवदानाचा दर १० लाखांत ४० असला तरी भारतात ०.०१ टक्केच आहे. त्यातही देशात अडीच लाख मूत्रपिंडाची गरज असताना केवळ ७ हजार मिळतात. ही वाढवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न गरजेचे आहे. नागपुरातील सुपरस्पेशालिटी रुग्णालय हे मध्य भारतातील मूत्रपिंड प्रत्यारोपणाचे पहिले शासकीय केंद्र आहे.

येथे महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून राज्यातील पहिले मूत्रपिंड प्रत्यारोपण झाल्याचीही नोंद आहे. येथे आजपर्यंत जवळपास ८७ मूत्रपिंड प्रत्यारोपण यशस्वी झाले आहे. त्यापैकी बहुतांश प्रत्यारोपण शासकीय योजनेतून झाले आहे. मेडिकलमधील रोबोटिक सर्जरी युनिटचा लाभ आता मूत्रपिंड प्रत्यारोपणाच्या रुग्णांनाही होणार आहे. मेडिकल प्रशासन सुपरस्पेशालिटी रुग्णालयातील मूत्रपिंड विभागातील तज्ज्ञांना रोबोटिक शस्त्रक्रियेच्या प्रशिक्षणासाठी पाठवणार आहे.



### संबंधित कंपनीकडून मदत

नागपुरातील सुपरस्पेशालिटी रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांना प्रशिक्षणाला पाठवण्यासाठी मेडिकलमध्ये रोबोटिक यंत्र उपलब्ध करणारी 'एसएसआय मंत्रा' ही कंपनी मदत करणार आहे. या कंपनीसोबत झालेल्या करारातील तरतुदीनुसार हे प्रशिक्षण उपलब्ध केले जाणार आहे.

मेडिकल हे रोबोटिक शस्त्रक्रिया करणारे देशातील पहिले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आहे. येथे आजपर्यंत वर्षभरात २२५ शस्त्रक्रिया झाल्या असून हा एवढ्या कमी कालावधीत सर्वाधिक शस्त्रक्रियेचा विक्रम आहे. येथे लवकरच रोबोटिक मूत्रपिंड प्रत्यारोपण केले जाणार असून त्यासाठी येथील तज्ज्ञ डॉक्टरांना प्रशिक्षणासाठी बाहेर पाठवले जाणार आहे.

– डॉ. राज गजभिये, अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल), नागपूर.

# व्याघ्रसंवर्धनासोबतच अन्य प्रजातींच्या संवर्धनावरही भर हवा

## केंद्रीय वन्यजीव मंडळाच्या बैठकीत सदस्यांचे मत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** व्याघ्रकेंद्रित संवर्धनासोबतच इतरही प्रजातींच्या संवर्धनावर तेवढाच भर असायला पाहिजे. संवर्धन नियोजनात समग्र दृष्टिकोन बाळगला पाहीजे. जैवविविधता आणि स्थलांतरित पक्ष्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या तलाव आणि पाणथळ जागा यासारख्या पर्यावरणीय संपत्तीनाही योग्य महत्त्व दिले पाहिजे, असे प्रतिपादन केंद्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीच्या सदस्यांनी केले.

केंद्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीचे इतिवृत्त नुकतेच संकेतस्थळावर सामाईक करण्यात आले.

वाघांच्या संवर्धनावर अधिक भर दिला जात आहे, पण संवर्धन नियोजन केवळ काही प्रमुख प्रजातींवर केंद्रित नसावे. इतरही जैवविविधता आणि स्थलांतरित पक्ष्यांसाठी तलाव तसेच पाणथळ जागा महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे व्याघ्रप्रकल्पाच्या बरोबरीनेच यासारख्या इतरही पर्यावरणीय घटकांना तेवढेच महत्त्व दिले पाहिजे, असे या बैठकीत समितीच्या सदस्यांनी सांगितले.

देशात दोन हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या दोन लाखांहून अधिक पाणथळ जागा आहेत. त्यातील केवळ १०२ पाणथळ जागा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. म्हणजेच या जागांना कायदेशीर संरक्षण मिळाले आहे.

पक्ष्यांसाठी या पाणथळ जागा महत्त्वाच्या आहेत आणि म्हणूनच त्यांचे संवर्धन आवश्यक असल्याचे मत देखील या बैठकीत सदस्यांनी व्यक्त केले.


EXPRESS Careers

**VACANCY**

**Advt. No. 1/2025/FSL/VRN/MISC-160(II) dt. 30.04.2025**

**GOA** Police invites applications for 10 posts each of Scientific Officer (SOC), Scientific Assistant (SOC), Searcher (SOC), Photographer, Videographer and Driver (Heavy Vehicle) purely on contract basis for a period of one year or till posts are filled on regular basis whichever is earlier in the Goa Forensic Science Laboratory, Verna-Goa. For details, visit Goa Police website, **https://citizen.goapolice.gov.in**

DI/ADVT/271/2025



# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात (टप्पा-२)

मान्य दिनांक : 13/02/2025

**संस्थेचे नाव : (2725MCP03) PCMC PRIMARY (Primary) - Without Interview**

प्रसिद्धी दिनांक : 25/04/2025

PCMC PRIMARY या व्यवस्थापनच्या शाळेमध्ये खाली नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या मात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

**आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशीन**

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंश कालीन | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षणा खेळाडू व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अनु. जाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | अनु. जमाती | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 4 | 8 |
| 3 | अनु. जमाती (pesa) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | वि.जा.(अ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| 5 | भ.ज. (ब) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 |
| 6 | भ.ज. (क) | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 4 |
| 7 | भ.ज. (ड) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 |
| 8 | इ. मा. व | 5 | 2 | 2 | 1 | 0 | 1 | 4 | 15 |
| 9 | वि.मा.प्र | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 |
| 10 | ई. डब्लू. एस | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 6 |
| 11 | एसईबीसी | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 6 |
| 12 | खुला | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 6 |
| | दिव्यांग (4%) | | | | | | | | |
| | | | | | Intellectual Disability & Multiple Disability (1%) | | | | एकूण |
| | अस्थिव्यंग (1%) 1 | कर्णबधिर (1%) 1 | | अंध/अल्पदृष्टी (1%) 0 | ID 0 | | MD 0 | | 2 |
| | अनाथ (1%) | | | | | | | | |
| | | अनाथ संस्थात्मक 1 | | | अनाथ संस्थाबाह्य 0 | | | | एकूण 1 |
| 13 | एकूण | 17 | 7 | 6 | 1 | 0 | 1 | 20 | 52 |

| शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशीत | | | | | | | | | मान्य दिनांक : 13/02/2025 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET / CTET | एकूण पदे |
| 1 | Urdu | Under Graduate Teacher std (1-4/5) | Consolidated Pay - UGT (16000) | Aided | All Subjects | Urdu | HSC ( Std. 12th) | Diploma | TET Paper 1/CTET Paper 1 | 39 |
| 2 | Urdu | Under Graduate Teacher std (1-4/5) | Consolidated Pay - UGT (16000) | Aided | All Subjects | English | HSC ( Std. 12th) | Diploma | TET Paper 1/CTET Paper 1 | 7 |
| 3 | Urdu | Graduate Teacher std (6-8) | Consolidated Pay - GT 6-8 (16000) | Aided | Mathematics-Science | Urdu | Graduate | Diploma / Graduate | TET Paper 2 (Maths - Science)/ CTET Paper 2 (Maths - Science) | 6 |
| | | | | | | | | Total | | 52 |

**सर्वसाधारण सूचना**

1 अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-2022 (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2022.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे, असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.

2. इच्छुक व अर्हता धारण करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदांसाठी पसंतीक्रम नमूद करून पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.

3 इ. 1 ली ते इ 5 वी व इ 6 वी ते इ 8 वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी - 2022 (TAIT) परीक्षेपूर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करू शकतील. डिसेंबर 2022 मध्ये CTET करिता प्रविष्ट उमेदवारांचा निकाल मात्र TAIT परीक्षेनंतर लागलेला असला तरी असे उमेदवार अर्ज करण्यास पात्र ठरतील.

4 इ. 6 वी ते इ. 8 वी या गटातली इतिहास/भूगोल/ सामाजिक शास्त्र या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) सामाजिकशास्त्र विषय घेऊन TET-Paper-2 / CTET - Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

5 इ. 6 वी ते इ 8 वी या गटातील विज्ञान/गणित/गणित-विज्ञान या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET / CTET) गणित-विज्ञान विषय घेऊन TET-Paper-2 /CTET - Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

6 इ. 6 वी ते इ. 8 वी या गटातील भाषा या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान किंवा सामाजिक शास्त्र यांपैकी कोणताही विषय घेऊन TET - Paper-2 / CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

7 इ 1ली ते 8 वी / इ. 9 वी ते 12 वी / अध्यापक विद्यालय या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-2022 (TAIT) या चाचणीस प्रविष्ट असणे आवश्यक आहे.

8 शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादी साठी सर्वसाधारण सूचना सविस्तर तपशिलासह https://tait2022.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये "उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना" या शीर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सूचना व सूचनांमध्ये नमूद आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करून स्वतःची खात्री करूनच ऑनलाईन अर्ज करावेत.

9 व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकूण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.

10 व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकूण पदांमध्ये अनाथ आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.

11 व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शवलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

12 उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयांच्या अध्यापनाच्या दोन विषयांसाठी एक पूर्णकालीन पदाची जाहिरात असल्यास, या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराची शैक्षणिक अर्हता दोन्ही विषयामध्ये पदव्युत्तर पदवी (किमान द्वितीय श्रेणीमध्ये) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

13 जिल्हा परिषद शाळांमध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २१/०६/२०२३ मधील तरतुदीनुसार जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

14 महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम, दि. २६/०२/२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र. ३४६८/२०२४ तसेच त्याअनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

**जाहीरात क्र.: 2025-26/30**

दिनांक : ३०/४/२०२५